# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/05/2023 (सोमवार) दुपार


### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक २८/०५/२०२३ चे ५/०० वा. ते दिनांक २८/०५/२०२३ चे १०/०० वा. सुमारास फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष व फिर्यादीच्या साळ भावाची मुलगी वय १६ वर्ष हे सकाळी ५/०० वा. फिर्यादी आपल्या पत्नी व मुलगा असे मिळुन कळमना मार्केट नागपुर येथे भाजीपाला घेण्याकरिता गेले तेव्हा मार्केट मधुन घरी परत आले असता फिर्यादीच्या दोन्ही अल्पवयीन मुली घरी मिळुन आल्या नाही. नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हरीश यंगलवार ब. नं ११७४ पोस्टे मौदा मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०४ कि. मी अंतरावरील मौजा कोदेगाव येथे दिनांक ०१/१२/२०२२ चे १०/०० वा. ते दिनांक २९/१२/२०२२ चे १८/०० वा. पर्यंत मौजा कोदेगाव येथील शेत सर्वे क्र. १७७ आरजी १.२६ हेक्टर आर मूळ शेत मालक नारायण शंकर झाडे, वय ६३ वर्ष, रा. बोरूजवाडा ता. सावनेर यांचे मालकिचे शेत असून **आरोपी क्र. १) नटराज बापुराव वरेकर, वय ५५ वर्ष, रा. पंचवटी नगर नागपुर २) नंदकिशोर नंदू मोरस्कर, वय ५० वर्ष, रा. नागपुर ३) नारायण शंकर झाडे, वय ४८ वर्ष, ४) सौ. सुमन नारायण झाडे, वय ४३ दोन्ही रा. उमरी ता. सावनेर** यांनी पूर्व नियोजित फौजदारी कट करून मूळ मालक ऐवजी आरोपी क्र. ३ व ४ असल्याचे दर्शवून बनावट खोटे विक्रीपत्र व दस्त ऐवज तयार करून ते खरे असल्याचे शासकीय रेकॉर्डवर दर्शवून आणि फिर्यादी यांना दर्शवून त्यांचे कडून १८,४५,०००/– रू. तिरूपती अर्बन को. ऑप. बॅंक आणि पंजाब नॅशनल बॅंक येथून चेक द्वारे पैसे घेवून आर्थिक फसवणूक करून केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन धनराज राउत, वय ३२ वर्ष, रा. पडोळे नगर बगडगंज नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम १२० (ब) ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४७१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी बोरकर पोस्टे खापा मो. नं ९५५२५३५८२५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर